Article Date	Headline / Summary	Publication
01 Nov 2026	Typical riders in health insurance	Prabhat (Marathi)

हेल्थ इन्श्युरन्समधील वैशिष्ट्यपूर्ण रायडर्स



पॉलिसीची परिणामकारता ही केवळ कव्हरेज रकमेवर नव्हे तर कव्हरेजच्या वैशिष्ट्यांवर देखील तितकीच अवलंबून असते. यापैकी काही वैशिष्ट्ये सर्वपरिचित आहेत. मात्र, काही अद्याप सर्वांपर्यंत पोहोचलेले नाहीत. या वैशिष्ट्यांमध्ये कव्हरेज वाढविण्याची आणि सुलभ क्लेम प्रक्रियेची क्षमता असते. अपरिचित असलेले लाभ जाणून घेतल्यास पॉलिसीधारकांना त्यांच्या गरजांच्या अनुरूप बनविलेल्या हेल्थ इन्श्युरन्स प्लॅनची निवड करण्यास मदत मिळते.

इन्श्युरन्स रकमेचे रिस्टोरेशन/रिइन्स्टेटमेंट: हेल्थ इन्श्युरन्स पॉलिसीमध्ये निश्चित इन्श्युरन्स रकमेचा समावेश असतो. या रकमेच्या कमाल मर्यादेत पॉलिसीदरम्यान वर्षभरात वैद्यकीय खर्चाची पूर्तता करणे शक्य ठरते. मात्र, व्यक्ती किंवा कुटुंबातील सदस्यांना एकापेक्षा अधिक वेळा एकाच वर्षात हॉस्पिटलायझेशन किंवा उपचाराची गरज भासू शकते. यामुळे उपलब्ध कव्हरेज मर्यादा संपू शकते. इन्श्युरन्स रकमेचे रिस्टोरेशन किंवा रिइन्स्टेटमेंट वैशिष्ट्याद्वारे इन्श्युरन्स रक्कम पूर्णपणे वापरल्यानंतर ती रक्कम आपोआप पुन्हा उपलब्ध करुन देण्याच्या सुविधेमुळे ही परिस्थिती हाताळण्यास मदत होते.

अमर्यादित इन्श्युरन्स रक्कम: काही वैद्यकीय स्थिती किंवा गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांमुळे हेल्थ इन्श्युरन्स पॉलिसीमधील मूळ इन्श्युरन्स रकमेपेक्षा लक्षणीयरित्या जास्त खर्च होऊ शकतो. अशा परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी, काही हेल्थ इन्श्युरन्स प्लॅन्स समावेशित वैद्यकीय स्थिती किंवा उपचारांसाठी अमर्यादित इन्श्युरन्स रक्कम वैशिष्ट्याची उपलब्धता करतात.

संचयी इन्श्युरन्स रक्कम : हे वैशिष्ट्य सर्वसाधारणपणे निवडक मल्टी इअर हेल्थ इन्श्युरन्स पॉलिसीसह उपलब्ध आहे. प्रत्येक पॉलिसी वर्षाची इन्श्युरन्स रक्कम स्वतंत्रपणे विचारात घेण्याऐवजी, प्रत्येक वर्षासाठी लागू असलेल्या इन्श्युरन्स रकमेची एकत्रित गणना करून संपूर्ण पॉलिसी कालावधीसाठी एकत्रित कव्हरेज रक्कम तयार केली जाते.

प्रीमियम लॉकिंग: कमी वयात पॉलिसी खरेदी करणाऱ्यांसाठी काही प्लॅन्समध्ये प्रीमियमची कमाल मर्यादा निश्चित केली जाते. जर मागील पॉलिसी वर्षादरम्यान कोणताही क्लेम दाखल केला नसल्यास प्रीमियम स्थिरतेसह पॉलिसीधारक प्रत्येक क्लेम फ्री वर्षासाठी नो क्लेम बोनस देखील कमवू शकतात.

प्रसूती आणि मातृत्व कव्हर: मातृत्व आणि प्रसूतीवेळची काळजी महत्त्वाची ठरते. या कव्हरेजच्या साहाय्याने प्रसूतीपूर्व टप्यात आई आणि बाळासाठी, आवश्यक वैद्यकीय गरजांची पूर्तता होण्याची खात्री मिळते.

प्रारंभिक सपोर्ट: हायपरटेन्शन, डायबेटिज आणि हायपोथायरोडिझम यासारख्या स्थिती सामान्य झाल्या आहेत. पारंपरिकपणे, या दीर्घकालीन स्थिती कव्हर होण्यापूर्वी पॉलिसीधारकांना दोन ते तीन वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षा कालावधीचा सामना करावा लागला. आता, ॲड-ऑन्स उपलब्ध आहेत जे प्रतीक्षा कालावधी केवळ काही दिवसांपर्यंत कमी करतात. पॉलिसीच्या ३१ व्या दिवसापर्यंत कव्हरेज प्रदान करतात.

उपभोग्य वस्तूंचे कव्हर: बहुतांश पारंपरिक हेल्थ इन्श्युरन्स प्लॅन्समध्ये, नेब्युलायझर किट, ग्लोव्हज, मास्क, कोल्ड पॅक/हॉट पॅक इ. सारख्या उपभोग्य वस्तूंना कव्हर केले जात नाही. तथापि, आज इंडस्ट्री या खर्चांना कव्हर करण्यासाठी डिझाइन केलेले रायडर्स ऑफर करते.

अमरनाथ सक्सेना
लेखक बजाज जनरल इन्श्युरन्सचे चीफ टेक्निकल ऑफिसर (कमर्शियल) आहेत.